म. ग्रं. सं. ठाणें

विषय नाटक

संग्रहालय क्रमांक २०५

लेखक रा. वि. गद्रे

पुस्तकाचें नांव श्री पार्वती स्वयंवर

सन

पुस्तक.

# रा० रा० रावजी विष्णु गद्रे


यांनीं रचिलें.

तें

महादेव भवानी गोळी दरगे

यांनीं

“ज ... लें.



॥ श्री ॥

# ॥ श्रीपार्वती विलास ॥

## प्रारंभः

दिंडी.

राग—लील,वरी, ताल—दादरा.

एके दिवशीं शंकर पार्वतीसीं ॥
अंकिं घेवोनी करि विलास तीसीं ॥
तैंसुरमुनि पातले दर्शनातें ॥
होत लज्जित अंबिका बघुनि त्यांतें ॥ १ ॥

साकी.

राग—जोगी. ताल—धुमाळी.

गिरिजा तेव्हां उठुनी सत्वर सदना माजी गेली ॥
विलोकुनी असें वदे मधुरवचें तिजशीं तो शशिमौळी
शंका कां धरिसी ॥ उघडीं कवाडासीं ॥ १ ॥

## अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

दाक्षायणि तैं वदे शिवाला ॥
सुरमुनि आले तव सेवेला ॥
नग्न असें मी बघुनि तयांला ॥
कशि बाहेर येऊं ॥ १ ॥

## साकी.

राग—जोगी. ताल—धुमाळी.

गिरिजे मजला मद्भक्तांची लज्जा तिलहि न वाटे ॥
ये ये सत्वर अंकीं बसये धांवत जाशी कोठें ॥
ऐकें मद्वचना ॥ न करीं चेष्टा नाना ॥ १ ॥

## साकी.

राग—जोगी. ताल—धुमाळी.

वेड लागलें तुह्मा कसें हें न कळे कांहीं मजला ॥
पुरे पुरे हो भाषण तुमचें शहाणे फारची झालां ॥
लज्जा कांहि तरी ॥ राखावी अंतरीं ॥ १ ॥

## दिंडी.

राग—लीलांबरी. ताल—दादरा.

शहाणपणा पाहसी काय आतां ॥
करुनि गेला पूर्वीच तो विधाता ॥

असें बोले शिव तिशीं परि न मानी ॥
तैं सुर मुनि पातले तया स्थानीं ॥ १ ॥

पद.

राग–मुलतानी. ताल—धुमाळी.

सुरमुनि नारद वदे शिवासीं, द्रव्य हीन जे पती ॥ त्यांसी कांता न मानिती ॥ ध्रु० ॥ वैभव ज्यांचें थोर असे त्या लुब्ध होति त्यांवरी॥ देती ठाव त्यांस अंतरीं ॥ द्रव्या भावें दीन होऊनी झाला जो रोडका ॥ मानिती त्यासीं कडु दोडका ॥ नाहीं वैभव देवा तुजला ह्मणुनी तूं सोसिशी ॥ कांता वचनें निष्ठुर अशीं ॥ १ ॥

पद.

( समज धर कांहीं, या चालीवर )

देवाअति माने ॥ वाहसी तूं तिजशीं ॥ परिती मानी न वचनासीं ॥ करीते चेष्टा ॥ निर्धन तूं ह्मणुनी ॥ होईल अपकीर्ती भुवनीं ॥ ज्यागृहीं बळरे ॥ वाढे कांतेचें ॥ तेथें तुच्छ वचन पतिचें ॥ तयानें जावें ॥ जावें विपिनासीं ॥ परतन यावें सदनासीं ॥ १ ॥

अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

कामिनिचें बळ जेथें असतें ॥

निर्माल्या सम मानिती पतितें ॥
सोडुनी त्यानें निज सदनातें ॥
जावें विपिनासीं ॥ १ ॥

पद.

राग—पीलू. ताल—धुमाळी.

आधीं युवतिच्या निष्टुर वचनें क्रोधाग्नी चेतला ॥ आज्या
चा मग परजन्य त्यावरी सुरमुनिनें सिंचिला ॥ तेव्हां
पशुपती स्वस्त्री सोडुनी वनवासा गेला ॥ तदा वृत्त हें
सांगती सखीजन स्वमुखें गिरिजेला ॥ १ ॥

पद.

राग—झिंझोटी. ताल—त्रिवट.

शिवें तुजला रम्यवाचे गिरितनये वाहिलें ॥
परि त्याचें वाक्य तूं तें सखये न मानिलें ॥
तुजलागीं ह्मणुनि त्यानें क्रोधानें सांगिलें ॥
करावें काय बाई विपरीत जाहलें ॥ १ ॥

दिंडी

राग—लीलांवरी. ताल दादरा.

अशी सखयांची परीसूनि वाणी
अती दुःखें बोलली ती भवानी ॥

अकर्णीक हट्टि हा असा आहे ॥
सांगतें मी लक्षणें याचीं पाहें ॥ १ ॥

पद.

राग—लीलांवरी. ताल—दादरा.

मदनारी पूर्वींहुनी ठाऊका असे ॥ पाठीं पोटीं सकलही कुल शून्यची दिसे ॥ ध्रु० ॥ तात, मात, बंधु, भगिनी ॥ नसती मातुळादि कोणी ॥ अकुळी हा आहे ह्मणनी ॥ भाजी मसीं दुःख वन्हि ॥ काय करूं साहूं मी दुःख हें कसें ॥ १ ॥

पद.

राग—कालींगडा. ताल—धुमाळी.

रथगज वारू त्यागुनि सारे वृषभावरि वसतो ॥ सुंदरवस्त्रें सोडुनि पांघरी गजचर्मांबर तो ॥ कैलासासम सुस्थळ टाकुनी स्मशानीं वसतो ॥ पिशाच्यांच्या संगें अनुदिनीं नृत्य सखे करितो ॥ १ ॥

साकी.

राग—पीलू. ताल—धुमाळी.

सुरत्नें श्रीमुक्तें कनकमणि माळा कंठिंन घाली ॥
नररुंडें जीं रुधिर स्त्रवती कंठीं ऐशीं धरीलीं ॥
सुगंधादिक उटीसज्यूनी उधळी भस्मशरीरीं ॥

धत्तुरपुष्पें[1] शिरीं धरी तो सोडुनी कुसुमें सारीं ॥ २॥

पद.

राग—परज. ताल—त्रिवट.

वानु किती मी दुर्गुण याचे ॥ ध्रु० ॥
सुधा त्यागुनी वीषचि प्याला ॥
सदा जातसे हा भिक्षेला ॥
मृदंगादिक वाद्यें याला ॥
नावडुनी करी स्फुरण दरांचें[2] ॥ वा० ॥
बाई माझा भोळा शंकर ॥
भावें अभावें ध्याती जे नर ॥
त्यांसीं देतो इच्छित गे वर ॥
निरसितसे गे दुःख भवाचें ॥ वा० ॥
अघटित घटना लोकीं करितो ॥
सूत्रधारची त्यांचा होतो ॥
प्रेमानंदें खेळ खेळतो ॥
सुख कसलें या गृह युवतीचें ॥ वा० ॥ १ ॥

अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

पर्णाया तो आला मजला ॥

---

१ धोत्र्याचीं फुलें. २ शंख.

मम जननी तैं वदलि पित्याला ॥
वृद्ध निर्बळ दिसतो याला ॥
कन्या न द्यावी ॥ १ ॥

आणखींही तिनें हें सांगितलें.—

अंजनी गीत.

राग—सदर.

निपुण विरागी दिसतो हा नर ॥
व्हावा कशाला या संसार ॥
देतां यासीं तरि सत्वर ॥
कन्येसीं पुसणें ॥ १ ॥

सख्यांनीं—

साकी.

राग—जोगी. ताल—धुमाळी.

यापरि माता वर्जितसे परी तातें नच मानीलें ॥
विधात्यानें माझ्या निढळीं लिहिलें तेंची घडलें ॥
त्याला काय करूं ॥कवणा देवालागिं स्मरूं ॥ १ ॥
मातेनें जें कथिलें त्याहुनी येथें दिसतें दूणें ॥
असो कथा हे परि सांगागे पशुपति कोठें बघणें ॥
न रुचे मज बाई ॥ सांगा करूं मी कायी ॥ १ ॥

पद

राग—जिल्हा. ताल—त्रिवट.

( जल भरनजात. या चालीवर )

जा जा वेगीं प्रियकर सुंदरी ॥
शोधा पतिला ह्या अवनीवरी ॥ ध्रु० ॥
असे कोणत्या स्थानीं बसला ॥
श्रुतकरा मसीं येउनि लौकरी ॥ जा०
जाउनि तेथें विनवुन आणिन ॥
माघारा मी त्यासी हो घरीं ॥ जा० ॥
येईना तो तरि मग मानिन ॥
निर्दय कपटी त्यासीं अंतरीं ॥ १ ॥

पद.

राग.—जिल्हा. ताल—धुमाळी.

( कोणकुटिल तूं चोरजार. या चालीवर. )

उमा वचन तें ऐकुनी निघती सत्वर त्या रमणी ॥ निघती गे०॥ हिम गिरिकाननीं शिव बैसला पाहती त्या दुरुनी ॥ आडुनी गे० ॥ पार्वतिसीं मग सांगायातें आल्या परतोनी ॥ तेथूनि गे० ॥ कथिती तिजशीं हिम गिरिकाननीं बसला तो रुसुनी ॥ सखये गे ॥ १ ॥

पार्वती — सख्यानों तेथें तो काय करित आहे बरें ?

सख्या.— पद.

राग—लीलांवरी. ताल—त्रिवट

हस्तीं धरुनी जपमाळा ॥
हृदयीं ध्यान धरुनि बसला ॥
घर्मानें अती डवडवला ॥
माथां जटा भार सुटला ॥
पाहिलें दुरुनी आह्मी त्याला ॥
आलों तुजशीं कथण्याला ॥ १ ॥

इतक्यांत—

अंजनीगीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

भूषण रवगे पडतां श्रवणीं ॥
लोचन उघडी त्रिशूल पाणी ॥
वधावयासीं आह्मा लागुनी ॥
उठला तत्क्षणीं तो ॥ १ ॥

तेव्हां—

अंजनीगीत.

ओळखील तो आह्मा ह्मणुनी ॥
धांवत सुटलों आह्मी तेथुनी ॥

ग्रंथ संग्रहालय

पाहीलें नच मागें वळुनी ॥
पुनरपि त्याजकडे ॥ १ ॥

पार्वती—सख्यानों.—

पद.

राग—भैरवी. ताल—त्रिवट

जाउं चला विपिनाला ॥
आणाया नाथाला ॥ ध्रु० ॥
रुसुनी जाउनी बसला कोठें ॥
मी हो पाहिन साला ॥ जा० ॥
मधुर भाषणीं प्रार्थुनि त्यासीं ॥
आणिन निज गेहाला ॥ जा० ॥

सख्या.—

पद.

राग—हमीर. ताल—त्रिवट

उत्सुककांहोसी ॥ सखये ॥ ध्रु० ॥ सकूमार तूं मार्गीं थकशिल करितां गमनासीं ॥ स० ॥ कांहीं दिन लोटतांचि येइल तव पति सदनासीं ॥ स० ॥ नच आला तरि घेऊन जाऊं तुजला विपिनासीं स॥०॥

शंकर— दिंडी.

राग—लीलांबरी. ताल—दादरा.

बघुनि त्यानां मच्चित्त व्यग्र झालें ॥

[library stamp]

तप माझें सर्वथा व्यर्थ गेलें ॥
काम जागृत जाहला शरीरांत ॥
चैन न पडे मज घोर अरण्यांत ॥ १ ॥

अंजनीगीत.

राग—झिंझोटी. ताल— धुमाळी.

ठुमकत ठुमकत चालत गजगति ॥ गिरि वि-
पिनींया आल्या युवती ॥ पाहुनि मजला
भ्याल्या चित्तीं ॥ शीघ्र गतीं गेल्या ॥ १ ॥

पद.

राग—कालिंगडा. ताल—दादरा.

त्यजूनि येथें व्यर्थ आलों प्रिय सखे तुला ॥ ध्रु० ॥
घडिभर तव विरह मला नाहीं सोसलागे ॥
राहुं कसा तुजवरी मम, लोभ गुंतला ॥ स० ॥
तप साधन न घडे मज ॥ वाटे कधीं बघेन तुज ॥
सुर मुनिनें कथुनी गुज ॥ ठकविलें मला॥स० ॥ १ ॥

दिंडी.

राग—लीलांवरी. ताल—दादरा.

प्रिये वांचुनियां मसीं राहावेना ॥

काकुळतीही कशीतिला ये ना ॥
करूं काय अतां बसुनि तरी येथें ॥
असें वदला तों मुनी येत तेथें ॥ १ ॥

साकी.

राग—पीलू. ताल—धुमाळी.

मुनी ह्मणे हे देवा आपुलें चित्त व्यग्र कां केलें ॥
शंभु ह्मणेरे तुवां आमुचें कपटें घर बुडवीलें ॥ १

अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

इच्छित वस्तु जिला देउनी ॥
रक्षण केलें बाल्या पासुनी ॥
तव वचनानें तिजला सोडुनी ॥
या विपिनीं आलों ॥ १ ॥

पद

राग—बागेसरी. ताल—त्रिवट.

मुनीवरा! दुःख तें काय कथूं तुजला ॥ ध्रु० ॥हाविरहाग्नी पार्वतिचा मम जाळित आहे तनुला ॥ मु०॥ सोसुं कसा मी अति दुःखद हा, झाला दुःसह मजला ॥ मु०॥ १ ॥

नारद— पंद

राग—बिहाग. ताल—दादरा.

कर कांता मदाकिनी इंदुशेखरा ॥ ध्रु० ॥ पर्णाया
योग्यन ती अन्य सुरवरां ॥ ध्रु०॥ तप्त हेम अंग कांति
रूप बघुनि लाजे रति ॥ वेदांची गुंगमति ॥ वर्णन ते
करुं न शकती॥ लोकत्रायें वंद्य असे जी सुरांनरां ॥क०॥

अंजनीगीत.

राग—झिंझोटी. ताल—दादरा,

नारद वचन ऐकून कर्णीं ॥
ऊर्वि तलावरी असे अपर्णी ॥
ऐशी गंगा शंभू पर्णीं ॥
गिरि शिखरीं तेंव्हां ॥ १ ॥

पद.

राग—सारंग. ताल—धुमाळी.

त्रिपूर मर्दन मोह पावला, भुलुनीगेला गंगेला ॥
विलास नाना करीतियेसीं, विसरला प्रिय नगबाळा ॥ ध्रु०॥
नर्तन, वादन, गायन करितो तिजशीं घेऊन एकांतीं ॥
वस्त्रें सुंदर भुषणें प्रति दिनीं परस्परें तीं लेववितीं ॥
नग्न होऊनी क्रीडा करितीं, न घेतीं मनीं शंकेला ॥
ऐसें अपार भोगीती सुख परी वीट नये चित्ताला ॥ १ ॥

अंजनीगीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

ऐसें मुनिनें देखुनी नयनीं ॥
धांवत गेला उभा भुवनीं ॥
बोले दुःसह संकट जननी ॥
तुजवरी ओढवलें ॥ १ ॥

नारद—माते. पद.

राग—लीलांवरी. ताल—धुमाळी.

( उधवा शांत वनकरजा या चालीवर )

तव कांतें तुजला सोडुनी केलीगे दुसरी भार्या ॥ध्रु०॥
क्रीडतसे अत्यानंदें करितो बहू तिजवर माया ॥
पाहुनि मी त्याची चर्या आलोंगे तुज कळवाया ॥
तत्मासी व्हावी ह्मणुनी कां करिसी श्रम हे वांयां ॥
गंगेसहहिमनगरानीं, करिविलास तो शुलपाणी, दुष्प्रा
प तुज लागोनी ॥ कांठेविसी आपुली काया ॥ २ ॥

साकी.

राग—पीलू. ताल—धुमाळी.

ऐसें ऐकूनी हिमनगकन्या बोले अति दुःखानें ॥ सख
यांनों जरी आला शिव तो तरि मजलागिन माने ॥१॥

मातें त्यजुनी रमे सवतिसीं त्याला काय करावें ॥
गेला प्राण सखे तरि त्याचें वदन पुन्हा न बघावें ॥ ३॥
दैवा तुझा प्रभाव विलक्षण आहे!—

अभंग.

राग—पीलू. ताल—धुमाळा.

जात होतें त्याला प्रार्थाया प्रीतीनें ॥
परी सवतीनें घात केला ॥
कायकरूं आतां यावरी वांचूनी ॥
जन्मलें पापिणी कैसी देवा ॥

असो. याउपर.

आपुलें मी मूख त्यासीं न दाविन ॥
कधींन पाहिन मीही साचें ॥ १ ॥

पद.

राग—जोगी. ताल—धुमाळी.

घेई मजला तव उदरींगे हे भूमी जननी ॥ दुःख रूप हें जीवित झालें काय करूं जगुनी॥ ध्रु० ॥नाथाविण मी अनाथ झालें प्राण आले नयनीं ॥ न रुचे मज राहणें आतां शून्य अशा सदनीं ॥ घे० ॥ १ ॥

### दिंडी.

राग–बर्वा. ताल–दादरा.

पावलेंमी या दुःख सागरातें ॥
खेद त्याचा होतना फार मातें ॥
नाथ माझा सवतिसीं प्रेम दावी ॥
दुःख मोठें हें सखे वदूं केवी ॥ १ ॥

### पद.

चाल—केरवा. त्रिवट.

सोसूं मी किती दुःख सखे गे ॥ ध्रु० ॥ दीर्घ वियोगें हृदय होतसे दुभंगयासीं काय करूं गे ॥ सो० ॥ दुर्दैवी मी व्यर्थ जन्मलें, दुःख द्यावया प्रिय पतिला गे ॥ सो० ॥ शोकानें उर दाटुनी आलें वाहती अश्रू नयनांतुनी गे ॥ १ ॥

### पद.

राग–जोगी. ताल–धुमाळी.

तुजविण काय करूं सदनीं ॥
राहुनि प्रिय सखया ॥ ध्रु० ॥
तुटला माझा सर्व आधार ॥
झालें केवळ निराधार ॥
नको नकोरे हा संसार ॥
गमे असार मज लागीं ॥ तु० ॥ १ ॥

नारद— पद.

राग—कालिंगडा. ताल—त्रिवट.

हर हर! काय असें हें घडलें ॥ ध्रु० ॥ जगत् जननी गौरी हिजला विर हें व्याकुळ केलें ॥ ह० ॥ काय करूं मी समजावूं कशी मजला कांहीं न कळे ॥ह०॥

पार्वती— पद.

राग—सारंग. ताल—धुमाळी.

पीकस्वरानें त्रास होतसे उडवा तिजशीं पळवागे ॥ कासाविस जिव झाला माझा जणु अळवाचा पळवा गे ॥ मदन तीक्ष्ण शर असह्य ऐसे भेदिति माझ्या हृदया गे ॥ त्रिशूल धर हर वृषभवाहन भेटाया मज आणा गे ॥ १ ॥

पद.

( माधवासीं कोणिसये या चालीवर )

प्रियजन विरह हा विकल करी ॥ ध्रु० ॥ सखयांनों मत्चित्त शांति हरी ॥ प्रि० ॥ कांहीं सुचेना कांहीं रुचेना राहूं कशि मंदिरीं ॥ प्रि०॥ विवेक करूनी मन आवरितें नावरे मज तें तरी ॥ प्रि० ॥ घडि पळ मजला चैन पडेना बनलें मी बावरी ॥ प्रि० ॥

पद.

राग—जोगी. ताल—धुमाळी.

नाथा या तव निर्दय कृत्यें काय ह्मणूं तुजला ॥
प्रेमातीशय दाखवुनी कां त्यागिलेंस मजला ॥ ना० ॥
मधुर भाषणें मोहित केलें माझ्या हृदयाला ॥
आतां कां मन कठोर करुनी दिधलें दुःखाला ॥ ना० ॥
विरहाग्नीच्या तीव्र ज्वाला जाळिती मत्तनुला ॥
कुठें पाहुं तुज साहूं कैसी असह्य दुःखाला ॥ ना० ॥ १ ॥

सखे—

पद.

राग—पीलू. ताल—दीपचंदी.

काय करूं मी प्रियपति वांचूनी ॥
वाटेना सुख मजला सदनीं ॥ ध्रु० ॥
गार न लागे विंझणवारा ॥
वाढवितो सखे देहीं उबारा ॥
कळवा त्यांना सत्वर जाऊनी ॥
जाजा आणा गेहीं प्रार्थुनी ॥१ ॥ का० ॥

पद.

( आजी अक्रुरहा याचालीवर )

असा निष्ठुर कां झालासी पति राया ॥

कशी आलि न तुजला माया ॥ ध्रु० ॥
विनोद वचनाचा राग मनीं आणूनी ॥
गेलासी मजवर रुसुनी ॥
होती इच्छा कीं एकवार तुज नयनीं ॥
पाहिन मी प्रेमें करुनी ॥ चाल ॥
परि हेतू निष्फळ झाला ॥
भुललासी या सठवीला ॥
आवडली मजहून तुजला ॥
नाहीं उचित कृती घडलीही, समर्थीया ॥
सोडाया आपुली भार्या ॥ १ ॥ अ० ॥

दिंडी.

राग—नवी. ताल—दादरा.

पडे व्याकुळती यापरी वदोनी ॥
वक्ष भाळ पिटितसे अति रडोनी ॥
ब्रह्म वृंदें नारदें बघूनी तें ॥
जात कळवाया वृत्त तें शिवातें ॥ १ ॥

दिंडी.

राग—लीलांबरी. ताल—दादरा.

कथी नारद जाऊनी तैं तयातें ॥

तुझ्यावीणें व्याकुळा गिरि सुता ते ॥
प्राण सोडिल वाटलें मन्मनाला ॥
ह्मणुनि आलों तुज वृत्त कथायाला ॥

पद.

राग—धनाश्री. ताल—धुमाळी.

वांचवि पार्वतिला ॥ शंभो ॥ तव विरहानल भाजितसे
तिज सत्वर शमवीं त्याला ॥ देवा० ॥ नेत्रीं प्राणचीं
राहले तीच्या उत्सुक तव भेटीला ॥ शं० ॥ १ ॥

अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

यावरि बोले पिनाक पाणी ॥
मी दुर्गेवरी आलों रुसुनी ॥
मुख न तियेचें पाहिन नयनीं ॥
कृतनिश्चय माझा ॥ १ ॥

नारद— पद.

राग—लीलांबरी. ताल—दादरा.

दीन शरण ती आहे तुह्माला ॥
प्राण दान द्या भेटुनी तिजला ॥ ध्रु० ॥
बाल्या पासूनी प्रेम करूनी ॥

कां आतांची निष्ठुर झालां ॥ दी० ॥
करुणा सिंधु ह्मणती तुह्माला ॥
करितां कां ह्या घोर कृतीला ॥ १ ॥

शंकर—नारदा—

साकी.

राग—जोगी. ताल—धुमाळी.

धिक्कारिति पूर्वीस्वपतिंना मूर्खमानिनी युवती ॥
दइत गुणांना आटवुनी मग पश्चात्तापा करिती ॥
सांच्या ह्या रीति ॥ दुःखास्पद त्यांहोती ॥ १ ॥

नारद—देवा फार काय सांगूं.—

अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

मयुरजसारे मेघ जलाची ॥
अति क्षुधित जन मधुरान्नाची ॥
तशिच अपर्णा त्वत् चरणाची ॥
इच्छा करित असे ॥ १ ॥
तूं येतोसी मनिं समजोनी ॥
सामोरी ती जात उठूनी ॥
या या नाथा ऐसें वदुनी ॥
भेटाया धांवे ॥ २ ॥

साकी.

राग—जोगी ताल—धुमाळी.

यापरि तिजला दिनरजनीं रे अति संतापचि होतो ॥
तुझ्या आलिंगना विना तो केवींविलया जा तो ॥
दुःसह दुःख अती ॥ निमुटपणें सोशीती ॥ १ ॥

अंजनीगीत.

राग—झिंझोटी ताल—धुमाळी.

त्रिकालज्ञ तूं जाणसी सारें ॥
ढोंग दाविसी कां मजसीं रे ॥
कृपा करूनी जा सदनारे ॥
हेंची इच्छितसें ॥ १ ॥

शंकर—मुनिवरा.—

साकी.

राग—पीलू. ताल—धुमाळी.

हें तव सारें भाषण ऐकुनीं, खळ खळ अश्रूयेती ॥
दया उपजली चित्तीं माझ्या, मना होतसे शांती ॥
॥१॥ उभारले रोमांच जाहली, धैर्यहीन ही काया ॥
उत्सुक झालों प्राण सखीतें, सत्वर आलिं गाया॥२॥

अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

मुनिवरातें ऐसें बोलुनी ॥
सद्गद झाला अंतःकरणीं ॥
धावुं लागला त्वरा करूनी ॥
कैलासीं जाया ॥ १ ॥

दिंडी.

राग—लीलांवरी. ताल—दादरा.

बघुनि ऐसें जान्हवी वदे त्यातें ॥
काय तुह्मीं जातसां त्यजुनि मातें ॥
शंभु बोले सांगतों ऐक गंगे ॥
चाल कैलास सदनिं मज संगें ॥ १ ॥

अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

नेतां त्यास्थळीं संगें मजला ॥
क्रोध येइल परि गिरिजेला ॥
शंभु ह्मणे मी ठेविन तुजला ॥
गुप्तपणें तेथें ॥ १ ॥
यापरि वचन देउनी तीतें ॥
शिरीं ठेवुनी मग गंगे तें ॥
त्वरें पातला कैलासातें ॥
उत्सुक होऊनी ॥ २ ॥

सख्या—गिरिजे—

पद

राग—भैरवी. ताल—दादरा.

धन्य धन्य धन्य आजी सुदिन उवगला ॥ ध्रु० ॥ ज्या
चा तुजनिशि दिनीं गे ध्यास लागला ॥ तोचि सखे
तव पति वघ सदनिं पातला ॥ ध० ॥

दिंडी.

राग—लीलांबरी. ताल—दादरा.

शिव आला ऐकुनी अपर्णेनें ॥
बंद केलें गृह द्वार अति त्वरेनें ॥
उभा राहोनी तिशीं हांक मारी ॥
तदा बोले ती असे कोण द्वारीं ॥ १ ॥

शंकर— साकी.

राग—पीलू. ताल—धुमाळी.

नीलकंठ मी द्वारीं आलों ओळख कां सांडीसी ॥
पार्वती—मयुरा जाजा लौकर येथुनी टाहो कां फोडीसी॥१॥
शंकर—मयुर नव्हे मी काळ कूटधर प्रेमें मजशीं पहावें ॥
पार्वती—कां आलासी भुजंगमातूं सत्वर भूताळें जावें ॥२॥

शंकर— पद.

राग—मुलतानी. ताल—धुमाळी.

नव्हे भुजंग सत्य सांगतों शूळी मी सुंदरी ॥
पार्वती—जा जा वेगीं वैद्या घरीं ॥
शंकर—शूळि नसे मी स्थाणू ऐसें बोलती अवनी वरी ॥
पार्वती—त्यानें राहावें गिरि गव्हरीं ॥
शंकर—स्थाणु न जाणसी, पशूपती मी समज आतां अंतरीं ॥
पार्वती—बैला रोविशिल शिंगें उरीं ॥ १ ॥
शंकर—

दिंडी.

राग–बर्वा. ताल–दादरा.

वाक्य जें जें बोलतों तूज पाशीं ॥
अर्थ भिन्न करुनि तें उडवीसी ॥
रुद्र आलों मी तुला भेटण्याला ॥
अतां अविलंबें उघडिं कवाडाला ॥ १ ॥

पार्वती—

अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

हे पवनात्मज अंजनी बाळा ॥
श्रीरामाच्या कर सेवेला ॥
वश्य कधिं न मी होइन तुजला ॥
चल जा येथूनी ॥ १ ॥

ऐसें उत्तर ऐकुनी पशुपती ॥
अति विस्मीत झाला चित्तीं ॥
ह्मणे शहाणी मजहुन ही अती ॥
आहे सत्यचि हो ॥ २ ॥
तेव्हां शंभू कड्या तोडुनी ॥
धांवत गेला उत्सुक भवनीं ॥
आलिंगिलि ती हिमनगनंदिनी ॥
अती प्रेमानें ॥ ३ ॥
क्रोधाचें मिष करुनी गौरी ॥
ह्मणे जोगड्या मी परनारी ॥
मजवर करिशी कां बलजोरी ॥
चल जा निर्लज्जा ॥ ४ ॥

साकी.

राग—जोगी. ताल—धुमाळी.

शिव बोले कां प्राण सखेग, केली पातळ माया ॥
गौरि ह्मणे मसीं त्यजुनी नाथा केली कां दुजि भार्या॥
ह्मणुनी मी रुसलें ॥ चित्तीं दुःखि जाहालें ॥ १ ॥

पार्वती—नाथा.

दिंडी.

राग—बर्वा. ताल—दादरा.

कोण तुमच्या प्रीतिला पात्र झाली ॥
असे कोठें ती गृहीं कां न आली ॥
काय कारण जाहलें सोडण्याला ॥
कसें आवडलें मर्सी भेटण्याला ॥ १ ॥
कुठे माझी ती सवत मला दावा ॥
तिच्या संगें न करीन कधीं दावा ॥
असे प्राणा समप्रीय जी तुह्मांला ॥
मान्य मजसीं न रुचे जरि मनाला ॥ २ ॥

शंकर—

पद

राग—खमाज. ताल—त्रिवट.

कां दोष प्रिये तूं देसिगे ॥ ध्रु० ॥
तप करण्यासीं गेलों विपिनीं ॥
तुजविण वरिली अन्य न कोणी ॥
सत्य सांगतों मी दिन वचनीं ॥
वाहतों आण गळ्याची गे ॥ कां० ॥ १ ॥

पार्वती—

दिंडी.

राग—बर्वा. ताल—धुमाळी.

तुझें मुख कां प्रियकरा म्लान झालें ॥

शंकर—अनुष्ठानीं उपवास फार केले ॥
पार्वती—तुझ्या नेत्रीं रक्तता कशी आली ॥
शंकर—प्रिये भक्षिलि वल्लि ही तिची लाली ॥ १ ॥

अंजनी गीत.

राग–झिंझोटी. ताल—दादरा,

पार्वती—तव तनु भिजली कां जिवनानें ॥
शंकर—पथीं धांवलों ह्मणुनि उन्हानें ॥
डवडवलींगे अति घर्मानें ॥
काय करूं यासीं ॥ १ ॥
पार्वती—दशनदंश हा दिसतो ओष्ठीं ॥
शंकर—शंखचिन्ह हें न मिथ्या गोष्टी ॥
विपरित शंका काढुनि कष्टी ॥
होसी कां सखये ॥ २ ॥

दिंडी.

राग–लीलांबरी. ताल–दादरा.

पार्वती—बहू येतो कां वास तव शरीरीं ॥
शंकर—भक्तें पुजिलें मज सुगंधोपचारीं ॥
पार्वती—नखांचीं हीं कांक्षतें ठाईं ठाईं ॥
शंकर—क्रिडा केली भूतांत फार पाहीं ॥ १ ॥

साकी.

राग—जोगी. ताल—धुमाळी.

पार्वती—दिसतें कंकण चिन्ह असें कां तुमच्या कंठा वरतीं ॥
शंकर—बैलानें मज शृंग रोंविलें कंकण खुणा नसे ती ॥
शंका काढूनी ॥ कष्टी होशी फिर फिरुनी ॥

दिंडी.

राग—बर्वा. ताल—धुमाळी.

अशी संपादणि शिवें तिची केली ॥
परी पार्वतिची दृष्टि ऊर्ध्व गेली ॥
पार्वती—जटां मध्यें लपविली कोण देवा ॥
शंकर—सांगतों गे तूं नको करूं हेवा ॥ १ ॥

शंकर— साकी.

राग—जोगी. ताल—धुमाळी.

वाटे मजला सुरमुनिनें तुज विपरित कांहीं कथिलें ॥
ह्मणुनी निश्चित ऐसें तवगे शंकित मानस झालें ॥
नोहे ही नारी ॥ शंका फेडुंनि घे सारी ॥ १ ॥

शंकर— पद.

राग—खमाज. ताल—धुमाळी.

मंथन समयीं विष प्यालोंमी दाह करी तें निजशरिरीं. ॥

शमवाया तो प्रिये घेतलें स्वर्गांबु हें शिरावरी ॥
पार्वती—स्वर्गांबू हें तरी वदन कां कथन करा मसीं मदनारी ॥
शंकर—नोहे आनन श्वेत कमल हें;सत्य सांगतों तुज गौरी
पार्वती— पद.

राग—लीलांबरी. ताल—दादरा.

वदतां हें श्वेत पद्म मान्य मज प्रती ॥
परि कां हो त्यास असे नेत्र दीसती ॥ ध्रु० ॥
शंकर—लोचन न मीन सखे उदकिं तळपती ॥
न कळे कशि भ्रमित तुझी जाहली मती ॥
पार्वती—मुक्ताफळ हार गळां बहुत शोभती ॥
शंकर—कुरंग लोचने तरंग त्यांत ऊठती ॥ १ ॥
पार्वती— दिंडी.

राग—झिंझोटी. ताल—दादरा.

दिसे कुचद्वय वक्षिकां सांग मातें ॥
शंकर—चक्रवाक बैसले नदि तटीं ते ॥
तुला कथितों सत्य मी तरी कां गे ॥
गमुनि अनृत बोलसी मसीं रागें ॥ १ ॥

अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—झुमाळी.

देतों मी तुज दिव्य सखे गे ॥
परि सोडीं हा शोध वृथा गे ॥
उमा ह्मणे द्या न भरा रागें ॥
हेंची प्रार्थितसें ॥ १ ॥

शंकर—

पद.

राग—लीलांबरी. ताल—धुमाळी.

घाल घटांतरीं घोर भुजंगम काढिन त्यांना करीं धरुनी ॥ ध्रु० ॥ न रुचे हें तरी तैल तापवीं आंत बुडवितों निज पाणी ॥ लोटुनि देईं उदकीं मजला हात पाय हे बांधूनी ॥ अविलंबें मी रामदयेनें येतों वरतीं बघ तरुनी ॥ घा० ॥ १ ॥

अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

हें ही न रुचे जरिगे तुजला ॥
उग्र दैवत दाखिव मजला ॥
तत्पदिं ठेवुनी निज हस्ताला ॥
शपथ सखे घेतों ॥ १ ॥

दिंडी.

राग—लीलांबरी. ताल—दादरा.

असे सत्य तरी मसीं काय भीती ॥

सखे माझी पाहिं गे ही प्रचीती ॥
ह्मणे अंबा बोलतां सत्य वाचे ॥
परी अर्थ जाणतें बोलण्याचे ॥ १ ॥

अंजनी गीत.

राग—माड. ताल—धुमाळी.

भुजंग आणिन घटांत घालुनी ॥
परि धरितां त्यां कंठीं कानीं ॥
तैल आणु मी जरी तापवुनी ॥
वन्हि असे नेत्रीं ॥ १ ॥

दिंडी.

राग—बर्वा. ताल—दादरा.

जरी उदकीं टाकीन मी तुह्मांला ॥
शिरीं धरितां आपुल्या सुरनदीला ॥
देव आणूं मी जरी तुह्मां पासीं ॥
नमिति साष्टांगें तूमच्या पदासीं ॥ १ ॥

शंकर— अंजनी गीत.

राग—माड. ताल—धुमाळी.

श्री रघुनंदन राम मला तो ॥
पूज्य असे मी त्यासीं ध्यातों ॥
अहर्निशी गे ध्यान धरीतों ॥
सप्रेमें साचें ॥ १ ॥

पार्वती—

## अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

अन्य दैवतें सर्वही सोडुनी ॥
श्री रघुनंदन मानव असुनी ॥
नाथा कां तुह्मी धरितां ध्यानीं ।
सांगा मजला हें ॥ १ ॥

शंकर—

## अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—त्रिवट.

हिमनगनंदिनी श्री रघुवीर ॥
लीलावतारी निर्विकार ॥
वेदादिकही नेणति पार ॥
मति कुंठित होती ॥ १ ॥
पूर्णब्रह्मा नंद निर्गुण ॥
मुक्त कराया देवां लागुन ॥
सगुणलीला वेष धरून ॥
भक्तां दावितसे ॥ २ ॥

## पद.

राग—संकरा. ताल—धुमाळी.

पूर्णब्रह्म राम गे ॥ वर्णूं त्यासीं काय गे ॥
दशरथ तात ज्याचा ॥ कौसल्या ती माय गे ॥

ब्रह्मांडांच्या कोटी गे ॥ सांठवितो पोटीं गे ॥
भर्गचाप भंगुनीयां ॥ पर्णी सीते लागीं गे ॥
ब्रह्म निर्विकार गे ॥ नाहीं त्या आकार गे ॥
साकार होउनी रक्षी ॥ पदीं नत दास गे ॥
आहे अंतरज्ञानी गे ॥ जाणे सकळ ध्यानीं गे ॥
अनुदिनीं ध्यान धरुनी ॥ प्रार्थितों मी त्यासीं गे ॥१॥

अपर्णे मी नित्य रामस्मरण करितों, याचें दुसरें एक कारण तुला सांगतों

पद.

राग—कालिंगडा. ताल—त्रिवट

ऐक सखे सुंदरी ॥ कारण ॥ ध्रु० ॥
काळकूट मी प्राशन केलें, करि तें दाह उरीं ॥ का० ॥
उपाय तेव्हां फारचि केले, शांत न होय तरी ॥ का० ॥
मंगलकर श्रीराम स्मरतां, शांति ये शरिरीं ॥ का० ॥
या करितां मन रामीं वसलें ॥ ध्यातों त्या अंतरीं ॥ कारण ॥१॥

पद.

राग—लीलावंरी. ताल—धुमाळी.

परमात्मा विष्णु साक्षात् अवतरला मानव उदरीं ॥ ध्रु० ॥
भू भार हरण कराया दैत्यांतें तो संव्हारी ॥
एकपत्नि एक वचनी, आहे गे हा व्रतधारी ॥
गोब्राह्मण प्रतिपालक जो, भक्त जनांचा हित कारी ॥

स्वेछेनें वर्तन करीतो ॥ पापी जन संव्हारीतो ॥
उद्धरुनी मुक्ती देतो ॥ विश्वाचातो अधिकारी ॥ १ ॥

अभंग.

राग—मालकंस. ताल—दादरा.

असातो असूनी हिंडेकां हो रानीं ॥
सीता सीता ह्मणुनी बोभावेकां ॥
हाका मारुनीकां वृक्षांनां आलिंगी ॥
केले कां हो जगीं खेळ ऐसे ॥
सांगतातो मर्सीं लक्ष्मीचा पती ॥
झाली कैसी मती गुंग त्याची ॥ १ ॥

पद.

राग—काफी. ताल—दीपचंदी.

वदतां तो अंतर ज्ञानी ॥
कैसा नुमजे आपुले ध्यानीं ॥ ध्रु० ॥
दशवदनें यतीरूप धरूनी ॥
नेली त्याची युवती हरूनी ॥
भ्रमितमती होवोनी ॥
शोक करित कां हिंडे रानीं ॥ १ ॥

शंकर—

अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

करुनी ऐशाचमत्कृतीला ॥
जना दाखवी असंख्यलीला ॥
अनुभव त्याचा आला तुजला ॥
स्मरण करीं साचें ॥ १ ॥

पार्वती—होहो, खरेंच ! एकेप्रसंगीं.

दिंडी.

राग—लीलांवरी. ताल—दादरा.

रघूनाथा भुलवीन मी ह्मणूनी ॥
त्वरें जानकिचें रूप हो धरूनी ॥
जरी गेलें मी वनीं त्याजपाशीं ॥
मुख मुरडूनी क्रमी तो वनाशीं ॥ १ ॥

नंतर त्याच्या जवळ जाऊन मी त्याला असें बोललें—

अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

कौसल्या सुत आत्मारामा ॥
शंकर हृदया पूर्ण ब्रह्मा ॥
जानकी लागीं पूर्ण कामा ॥
" आलींगन द्यावें ॥ १ ॥

दशवदनाचे हस्तांतूनी ॥
पूर्व सभाग्यें आलें सुटुनी ॥
आतां मजला प्रेमें करुनी ॥
आलिंगन द्यावें ॥ २ ॥

साकी.

राग—जोगी. ताल—धुमाळा.

सौमित्री तैं वदे तयातें पद्मदलाक्षारामा ॥ सीतेसीं आलिंगन देउनी पुरविं तियेच्या कामा ॥ १ ॥ रघूवीर मम कपट समजुनी सौमित्रासीं सुचवी ॥ ह्मणे आपणा ठकवायासीं आलि अपर्णा देवी ॥ २ ॥

राम—सौमित्रा.

श्लोक.

राग—कानडा.

जो चर्म नेत्रीं न दिसावयाचा ॥
वर्णूंशके ज्यास न वेदवाचा ॥
त्या शंभुचीही ललना अह्मासीं ॥
सीता रूपें पातलि या वनासीं ॥ १ ॥

श्लोक.

राग—कानडा.

घेऊनि अष्टतनु जो धरितो जगातें ॥
सूर्याग्नि चंद्र असती नयनें जयातें ॥

आहे यथार्थ जगिं ईश्वर नामज्याला ॥
त्याशंभुची प्रियतमाटकवी अह्माला ॥ १ ॥

आर्या.

राग—धनाश्री.

ज्यातें सर्वहि नियमें आराधितिसर्वकाळ नमनांहीं ॥
त्या गिरिशाची भामिनि सौमित्राहे, सिता खचित नाहीं॥१॥

नंतर.—

अंजनी गीत.

राग—झींझोटी ताल—धुमाळी.

जानकिवल्लभ बोलत मातें ॥
ज्ञानगंगे हिमनग सूते ॥
मोडुनि कांगे शिवाज्ञेतें ॥
आलिस या स्थानीं ॥ १ ॥

मग.—

इतुकें बोलुनी कौसल्यासुत ॥
सीते सीते ह्मणुनी बाहत ॥
वृक्ष पाषाण ओ देत ॥
नवल मसीं झालें. ॥ २ ॥

राम— ॥ पद ॥

राग—बर्वा. ताल—धुमाळी.

हर हर ! हे दुःसह कैशी दुर्दैवें करणी केली ॥ जानकिचें वचन ऐकुनी निबिडवनीं शीघ्र निघालों ॥

कांचनमृग वधुनी सत्वर निजस्थाना सन्निध आलों ॥ परि सीता न दिसेजाणुनी अति दुःखें खिन्न जहालों ॥ न कळे ती कोणी नेली ॥ अथवा ती कोठें गेली ॥ भ्रमित मती माझी झाली ॥ काय करूं मी या कालीं ॥ १ ॥

अरे रे !

पद.

राग—बिभास. ताल—दादरा.

वामनेत्र याच समयीं स्फुरण पावतो ॥ काय मर्सी न कळे हा अशुभ सुचवितो ॥ ध्रु० ॥ दुःसह अति दुःख वेग हृदयीं ऊठतो ॥ क्षणोक्षणीं मूर्छित मज करूं पाहतो॥१॥

दिंडी.

राग—लीलांवरी. ताल—धुमाळी.

प्रिये अपराधी जाण खचित मातें ॥
कृपा करगे या सोड अमर्षातें ॥
क्रोध करणें सेवकीं योग्य नोहे ॥
निरपराधी जन असा कोण आहे ॥ १ ॥

पहाबरें,

दिंडी.

राग— लीलांवरी. ताल—दादरा.

तेचशशि रश्मी दुःख मला देती ॥
तेच मदनाशुगप्रतीकूल होती ॥

जयें पूर्वीं अति सौख्य मला दिधलें ॥
तेंच तव विरहें दुःखदसें झालें ॥ १ ॥

पद

राग—बागेसरी. ताल—त्रिवट.

तुझें ध्यान मनीं मसीं लागलें ॥
कमल लोचने प्रियकरणी ॥ ध्रु० ॥
दावानलसम शशिकर भाजिती ॥
शरिरीं मदनें पीडिलें ॥ १ ॥

दिंडी.

राग—लीलांवरी. ताल—दादरा.

मज जवळी आसतां तुजहराया ॥
शकति असुरहिन मसीं जिंकुनीया ॥
असें असुनी न दिससिलोचनाला ॥
दैव योग हा मज कसा उदेला ॥ १ ॥

दिंडी.

राग—लीलांवरी. ताल—दादरा.

क्षणभरही वीयोग मत्प्रियेचा ॥
कल्पशता समान होत साचा ॥
बहूदिन जरि लागती भेटण्याला ॥
सहन कैसें करवेल मन्मनाला ॥ २ ॥

अंजनी गीत.

राग—माड. ताल—धुमाळी.

जानकि मजला तुज वाचूनी ॥
घडिपळ वाटे युगावाणी ॥
दीर्घ विरह हा कैसागे जनीं ॥
साहूं मी सखये ॥ १ ॥

आतां कोणालापुसावें. ?

दिंडी.

राग—लीलांबरी. ताल—धुमाळी.

कल्प वृक्षा ह्या रम्य वनामाजी ॥
जिनें मजला त्यागिलें अशी माझी ॥
जनक नंदिनि सुंदरी सिता तुजला ॥
फिरत दिसली कीं सत्य सांगमाला ॥

अथवा.

अंजनी गीत.

राग—माड. ताल—धुमाळी.

क्रोध धरूनी राहिल लपुनी ॥
परी न कधीं वसली रुसुनी ॥
ह्मणूं जरी मी गेली पळुनी ॥
मजवर मन तीचें ॥ १ ॥

## अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

राग यावया कारण कांहीं ॥
एक वारही घडलें नाहीं ॥
अथवा कठोर वचनांनीही ॥
वदलों न तिजला ॥ १ ॥

## दिंडी.

राग—लीलांवरी. ताल—दादरा.

मृदूगात्रे कमलाक्षि भूमि सूते ॥
कुठें गेलिस टाकुनी प्रिये मातें ॥
काय करुं मी वांचुनी जगीं आतां ॥
तव विरह देतसे ताप चित्ता ॥ १ ॥

## पद.

राग—तोडी ताल—त्रिवट.

कवण्या स्थळिं तूं असशी सीते ॥
काय करूं गे न सुचे मातें ॥ ध्रु० ॥
लक्ष्मणादिक जनीं वनीं तुज ॥
शोधिति परि तूं न दिससी त्यांतें ॥ १ ॥

पद.

राग—धनाश्री. ताल—त्रिवट.

कुठे पाहुं मी तुला प्रियेगे, साहुं कसा ह्या दुःखाला ॥
विरहाग्नीच्या तीव्र ज्वाळा, जाळिति जानकि मत्त
नुला ॥ तव भेटीची आशा धरुनी, वियोग आजवर
सोसियला ॥ परिया समयीं निरवधि देतो, दुःसह
अतितर ताप मला ॥ १ ॥

पार्वती—

अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—त्रिवट.

यापरि जेव्हां दुःखी होउनी ॥
शोक करीतो निबिडारंणीं ॥
तेव्हां सत्वर त्यासीं जाउनी ॥
नाथा पुसिलें हें ॥ १ ॥
सीते सीते ऐसें ह्मणुनी ॥
दुःख करित कां फिरसी रानीं ॥
आलिंगिसि कां तरु पाषाणीं ॥
सीता समजुनि रे ॥ २ ॥

तेव्हां तो मला ह्मणाला.—

पद.

राग—बेहाग. ताल—ख्याल.

पुससी काय मला ॥ पार्वती ॥ ध्रु० ॥ कैलासापति

जाउन सत्वर, यत्नें तव पतीला ॥ विचारितां तुज
कथील सारें, निरशिल भ्रांतीला ॥ १ ॥

पद.

राग—बहार. ताल—त्रिवट.

ज्ञान दृष्टिनें पार्वती ॥
पाहसिल तरि तुज कळून येइल ॥
कां होसी अशि भ्रमित मती ॥ ज्ञा० ॥
सीते सीते ऐसें वदुनी ॥
आलिंगीतों प्रेमें करुनी ॥
तरु पाषाणचि दिसती नयनीं ॥
परी तपोनिधि हेगे असती ॥ ज्ञा० ॥
अनंत वरुषें तप आचरिलें ॥
करुनि रुपांतर विजनीं राहले ॥
भेटाया मज उत्सुक झाले ॥
आलिंगुनि त्यां देतों शांती ॥ ज्ञा० ॥ १

असें आहे परंतु सांप्रत.

श्लोक.

राग—भैरवी.

पुष्पाचाच सुवास कल्पतरुच्या हा सूटला भोंवतीं ॥
ने, वायु जिकडे तयास तिकडे भृंगे पहा धांवती ॥

गंगेच्या जल बिंदुनीं भिजविली काय मदीया अती ॥
माझें चित्त तथापि येथनरमे सीतेविना पार्वती ॥ १ ॥

पार्वती.—

अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

यापरि वदला मजला विपिनीं ॥
मीही समजलें आपुले ध्यानीं ॥
विष्णु मानव रूप धरूनी ॥
क्रीडा करित असे ॥ १ ॥

नंतर—

दिंडी.

राग—लीलांबरी. ताल—दादरा.

असति दुर्लभ बहु पाय मला जीचे ॥
घडे दर्शन अजि दैव बळें तीचें ॥
अशीं वचनें बोलुनी मला रामें ॥
पूजियेलें त्यावनीं अति प्रेमें ॥ १ ॥
तदा आशिर्वादासि मीहि केलें ॥
समरिं विजयी हो असें बोलिजेलें ॥
रघूरामें मम मूर्ति स्थापियेली ॥
अंशरूपानें मीहि वस्ति केली ॥ २ ॥

अंजनी गीत.

राग—झिंझोटी. ताल—धुमाळी.

तुळजा पुरिची झालें भवानी ॥
पूजिति जन मज प्रेमें करुनी ॥
मीही त्यांना प्रसन्न होउनी ॥
संतुष्टचि करितें ॥ १ ॥
ऐसा वृत्तांत पूर्वीं घडला ॥
परि या समयीं मसिं नाठवला ॥
स्वप्रश्नाचा निर्णय केला ॥
आपुल्या तोंडानें ॥ २ ॥

साकी.

राग—कालिंगडा. ताल—धुमाळी.

सुंदरि पूर्वीं वाल्मिक ऋषिनें भविष्य केलें जैसें ॥
विष्णूनें अवतार धरूनी वर्तन केलें तैसें ॥ १ ॥ पव
नात्मज जो अंजनिनंदन मारुति ह्मणती ज्याला ॥
मदंशें तो अवतरला गे रामाच्या सेवेला ॥ २ ॥

साकी.

राग—पीलू. ताल—धुमाळी.

कनक भूषणीं भिन्नाकृति परी सुवर्ण एकचि जैसें ॥

विष्णु आणि मी एकरूपची सत्य समज मानें ऐसें ॥
भेदनसे कांहीं ॥ नटलों भिन्न रूपें दों ठायीं ॥ १ ॥

पार्वती— अंजनी गीत.

राग—माड. ताल—धुमाळी.

भाषण तुमचें ऐकुनि कर्णीं ॥
तृप्त मी झालें अंतःकरणीं ॥
सुचरित्र हें ठसलें ध्यानीं ॥
प्रिय करा माझ्या ॥ १ ॥

शंकर—

चिच्छक्ती तूं आद्य स्वामिणी ॥
जाणसि सारें मूळा पासुनी ॥
गौरविलें तुज विनोद वचनीं ॥
प्राण सखे माझे ॥ १ ॥

साकी.

राग—पीलू. ताल—धुमाळी.

ब्रह्मेंद्रादिक सुरमुनि योगी ज्या तुज हृदयीं ध्याती ॥
तो तूं स्त्रीशीं विलास करुनी लीला दाविशि जगतीं ॥ १ ॥
पार तुझा रे न कळे कवणा वससी सर्वां भूतीं ॥
विष्णुसूत तुज शरण येउनी याचितसे तव भूती ॥ २ ॥

## दिंडी.

राग—लीलांबरी. ताल—दादरा.

अखिल जन हा ऊतरो संकटांतें ॥
पाहो सकल जन आत्म मंगलातें ॥
पावो निखिलजन स्वस्व कांमनातें ॥
मुदित होवो जन जगीं स्वस्थलातें ॥ १ ॥
एकमेकांचा द्वेष ज्या करीती ॥
कधीं एक्या स्थानिं ज्या न राहाती ॥
त्या गीःश्रींची होउंदे संगती ती ॥
सज्जनासीं या जगीं मिळो भूती ॥ २ ॥

॥ समाप्त ॥